# प्रकरण - १

## कामगार शिक्षण योजनेचा इतिहास आणि कार्यपध्दती

१) भारतीय उद्योगाचा उद्गम आणि विकास

२) भारतामधील उद्योगवार कामगारांची संख्या

३) कामगारांचे लोकशाहीतील महत्व

४) भारतामधील औद्योगिक कामगारांची वैशिष्टये

५) भारतीय संविधानात कामगाराला मिळालेले हक्क

६) शिक्षणाची व्याख्या व प्रक्रिया

७) कामगारांचे कमी शिक्षणामुळे होणारे दुष्परिणाम

८) कामगार शिक्षण योजनेचा इतिहास

९) कामगार शिक्षण योजनेची यंत्रणा

१०) केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाची उद्दिष्टे व कार्ये

११) कामगार शिक्षण योजनेचे उद्देश व कार्यपध्दती

१२) कामगार शिक्षण योजनेचे फायदे व उणिवा

१३) कामगार शिक्षण योजनेचे महत्व

१४) कामगार शिक्षण योजनेची सद्य परिस्थिती

१५) कामगार शिक्षण योजना सुधारण्यासाठी सुचना.

## प्रकरण - १

## कामगार शिक्षण योजनेचा इतिहास आणि कार्यपध्दती

### प्रस्तावना-

आर्थिक क्रियांचा हेतू मानवाच्या जीवन निर्वाहविषयक गरजा पूर्ण करणे हा असतो. त्या गरजा सहज सुलभ रीतीने भागविणे शक्य व्हावे म्हणूनच साधनांचा शोध व वापर केला जातो. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर मानवाची खाद्य संकलन अवस्थेत निसर्गामध्ये उपलब्ध असणा-या वस्तुवरच मानव आपली गुजराण करीत होता. पाने, फुले, फळे, कंदमुळे, मध, मुंग्या इत्यादींवर आपली भूक भागवत होता. या अवस्थेत मानवाने कोणतीही साधने अगर आयुधे यांचा शोध लावलेला नव्हता. या अवस्थेतूनच मानवाने हळूहळू प्रगती करून नवनवीन साधने व आयुधे यांचा शोध लावून आजची प्रगत यंत्रोत्पादन पध्दती शोधून काढली. शिकार, मासेमारी व शेती या आर्थिक क्रियात विविध प्रकारची हत्यारे व तंत्रे वापरली जात. शिकारीत धनुष्य, बाण, फास, जाळी, सापळे, खड्डे, चोरखड्डे इत्यादींचा वापर केला. तर शेतीच्या प्रथमावस्थेत टोकणी, फावडे, कुदळ, नांगर इत्यादी अवजारे वापरात आपली त्यामुळे मानवाच्या प्राथमिक अवस्थेत ज्या आर्थिक क्रिया साधाने व अवजारे यांच्या साहयाने केला जात त्या आर्थिक क्रियांचा उल्लेख साध्या स्वरूपाचे उद्योगधंदे असा केला जातो. यानंतरच्या अवस्थेत उत्पादनातील नविन तंत्र, यंत्र साधाने व अवजारे

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

यांचे शोध लावले गेले. जुन्या हत्यारांत अगर साधनांत सुधारणा घडवून आणणारे शोध व नविन यंत्राची निर्मिती व ती यंत्रे चालवण्यासाठी पाणी व बाष्पशक्ती या सारख्या साधनांचा शोध यामुळे मानवी जीवनाचा कायापालट झाला. म्हणून यंत्रोत्पादन साधनांच्या संदर्भात उद्योगधंद्याची व्याख्या केली जाते ती पुढीलप्रमाणे " ज्या उत्पादित आर्थिक क्रिया विशेष यांत्रिकी तंत्राचा अगर तंत्रविद्यात्मक साधनांचा वापर करतात त्या आर्थिक क्रियेला उद्योगधंदा असे म्हणतात ".[१]

---

१. नाडगोंडे (डॉ.गुरुनाथ) : औद्योगिक समाजशास्त्र
पृ - ३८.

१) भारतीय उद्योगाचा उद्‌गम आणि विकास :

(अ) स्वातंत्र्य पूर्व काळातील उद्योगधंद्याचा विकास :

इ.स. १८५४ साली सुती उद्योगधंद्याचा मुंबईमध्ये प्रारंभ झाला. याचवेळी उद्योगधंद्याच्या संघटित इतिहासास प्रारंभ झाला. १८५५ साली परदेशी कंपनीने कलकत्ता येथे ताग उद्योगाची ( Jute Industry) सुरुवात केली. याचवेळी कोळसा उद्योगाचाही विकास झाला. या प्रमुख उद्योगाचा विकास पहिल्या महायुध्दापूर्वी झाला. पहिल्या व दुस-या महायुध्दाच्या काळात व त्यानंतर कांही उद्योगधंद्याविषयी सौम्य धोरण अवलंबीले. १९२० ते १९४० पर्यंतच्या काळात इंग्रज सरकारने भारतीय स्वातंत्र्य चळवळी प्रमाणेच भारताच्या आर्थिक - औद्योगिक विकासाची प्रगती रोखून धरण्याचा बराच प्रयत्न केला तरी कापड गिरण्यांचा उद्योग, रेल्वे मार्गांचे जाळे, जमशेटपूरची टाटांची पोलादाची गिरणी, बंगालमधील ज्यूट उद्योग, चहांच्या मळयांचा धंदा, कोळसा, मॅंगनीज, लोखंड, वगैरेंच्या खाणी असे कांही मोठे उद्योग व बरेचसे लहान व थोडे मध्यम दर्जाचे उद्योगधंदे यांची वाढ होवु देणे त्यांना भाग पाडले होते.[२] पोलाद, साखर, सिमेंट, काच, रसायने, साबन, वनस्पती, या सारख्या उद्योगांची झपाटयाने वाढ झाली. परंतु होणा-या उत्पादनाच्या मानाने अंतर्गत मागणी अल्पप्रमाणात होती.

१९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत इंग्लीश लोकांनी भारतामध्ये कारखाना उत्पादन पध्दती संबंधी विशेष विचार केलेला नव्हता अंतर्गत दळणवळणाच्या साधनांचा अभाव व भारतात कायमपणे जमिनी घेण्याबद्दल

---

२. उर्ध्वरेषे, प्रभाकर : कामगार चळवळ २००१ आव्हाने व आवाहने (संपादन) पृ - २०

इंग्लीश लोकांवरती बंधने यामुळे त्यांनी कारखाना उत्पादन पध्दतीस रस घेतलेला नव्हता पण १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात या अडचणी आपोआपच दूर झाल्याने व इ.स. १८७५ नंतरच कारखाना उत्पादन पध्दतीची सुरुवात भारतात झाली. इ.स. १८७७ पर्यंत भारतात ५१ कापड गिरण्या व ताग गिरण्या प्रस्थापित झाल्या.[3]

पहिल्या महायुध्दापर्यंत भारताचा औद्योगिक विकास घडवून येण्यास पुढील कारणे महत्वाची आहेत.

१) बदललेली आर्थिक परिस्थिती.

२) व्यापारी केंद्रे आस्तीत्वात आली.

३) इंग्लीश भाषेचा प्रसार झाला.

४) ईस्ट इंडिया कंपनीची मक्तेदारी संपली.

५) देशातील व परदेशातील राजकिय घटना.

वरील कारणांमुळे भारतात अधुनिक उद्योगधंद्याचा उदय झाला. पहिल्या महायुध्दापर्यंत देशातील औद्योगिक विकास समाधानकारक नव्हता. कच्च्या मालाचा पुरवठा मुबलकपणे उपलब्ध असताना, असंख्य लोक बेकार असताना अथवा मनुष्यबळ विपुलप्रमाणात उपलब्ध असताना आणि देशात व देशाबाहेर उत्तम बाजारपेठा असताना भारतामध्ये फक्त २ टक्के लोक कारखान्यात गुंतलेली होती.[4] पहिले महायुध्द, १९१९-२० चा भरभराटीचा काळ, १९२१ ची आणिबाणी, १९२१-२७ मधील विनिमय दराची अस्थिरता १९२९-३३ मधील

---

३. नाडगोंडे (डॉ.) गुरुनाथ : औद्योगिक समाजशास्त्र. पृ. ५९.
४. तत्रैव पृ. ६१

महामंदी, १९३४-३७ मधील परिस्थितीतील सुधारणा, १९३५ मधील नविन राज्यघटना व १९३७-३९ मधील लोकमान्य मंत्रीमंडळाची स्थापना इत्यादी दोन महायुध्दाच्या काळातील घटनांमुळे या काळात भारतातील औद्योगिक विकास झाला.[५]

(ब) स्वातंत्र्यानंतर भारतातील औद्योगिक विकास -

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने उद्योगधंद्याचा विकास करण्यासाठी जाणीवपूर्वक पाऊले टाकून औद्योगिक प्रगती होण्याच्या दिशेने औद्योगिक धोरण १९४८ साली जाहीर केले. त्यात भारतातील खाजगी उद्योगधंदे, कामगारांचे उद्योगधंद्यातील स्थान, परकिय भांडवल, इत्यादी बाबतीतील धोरण स्पष्ट करण्यात आले. समिश्र अर्थव्यवस्था हे औद्योगिक धोरणाचे सुत्र ठरवून इ.सं. १९५० मध्ये देशाच्या औद्योगिक विकासाला वेग व वळण देण्यासाठी नियोजन मंडळाची स्थापना केली.[६]

स्वातंत्र्यानंतरच्या पंचवार्षिक योजनांची आखणी औद्योगिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहे. १९५६ मधील नविन धोरणाने उद्योगधंद्याचे वर्गीकरण अ, ब, क, या गटात करण्यांत आले.[७] "अ" गटातील उद्योगधंद्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवर सोपवण्यात आली. या गटात अणुशक्ती, वीज, शस्त्रे, व दारूगोळा, विमाने, लोखंड व पोलाद यासारखे १७ उद्योगांचा समावेश केला.[८] "ब" गटातील उद्योगधंदे जरी खाजगी मालकीचे असले तरीसुध्दा हळूहळू सरकार त्या उद्योगधंद्याचा ताबा घेईल. उदा. रस्ता व जलवाहतूक, यंत्रसाधने, ॲल्यूमिनीयम, रसायने खाते, इत्यादी १२ उद्योगांचा समावेश

५. तत्रैव पृ. ६१

६. India 1986 p-419

७. Ibid. p.419

८. Ibid. p.419

या गटात केला.[९] "क" गटात इतर उद्योगधंद्याचा समावेश करण्यात आला व हे उद्योगधंदे खाजगी मालकीचे ठरवण्यात आले.[१०]

आतापर्यंत सात पंचवार्षिक योजना पूर्ण झालेल्या आहेत पहिल्या पंचवार्षिक योजनेची सुरुवात १९५१ सालापासून झाली. गेल्या सात पंचवार्षिक योजनांमधून उद्योगधंद्याचा विकास झालेला आहे.

२) भारतामधील उद्योगवार कामगारांची संख्या.

१९८१ साली भारतातील एकूण कामगारांची संख्या देशातील एकूण लोकसंख्येच्या ३६.७७ टक्के होती.[११] भारतातील कामगारांची संख्या १९८१ च्या जनगणनेनुसार पुढील प्रमाणे.[१२]

| उद्योग | पुरुष कामगार | | स्त्रि कामगार | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| कल्टीव्हेटर | ७७६ | २२.५६ | १४९ | ४.६५ | ९२५ | १३.९१ |
| कृषीं कामगार | ३४७ | १०.१० | २०८ | ६.४६ | ५५५ | ८.३४ |
| गृह उद्योग | ५६ | ०१.६४ | २१ | ०.६४ | ७७ | १.१६ |
| इतर कामगार | ५९६ | १७.३२ | ७२ | २.२४ | ६६८ | १०.०४ |
| | ३५ | १.०३ | १८६ | ५.७७ | २२१ | ३.३२ |
| एकूण | १८१० | ५२.६५ | ६३६ | १९.१७ | २४४६ | ३७.१७ |

९. India 1986 p.419
१०. Ibid. p.419
११. Ibid. p.528
१२. Quoted by India 1986 p.528

महाराष्ट्रात औद्योगिक कामगारांची संख्या (११, ५८, ९६५) सर्व राज्यापेक्षा जास्त आहे.[१३]

महाराष्ट्रातील उद्योगावार कामगारांची संख्या पुढीलप्रमाणे

राज्यातील कांही प्रमुख उद्योगांतील कामगारांची संख्या (१९८३ मध्ये)[१४]

| उद्योग | कामगारांची संख्या ( लाखामध्ये ) |
|---|---|
| १) सुतीकापड, लोकर, रेशमी कापड व कृत्रीम धागा, कापड उद्योग. | ३.०७ |
| २) धातूच्या वस्तू, मूलभूत धातू व खनिजे | १.७५ |
| ३) रसायने, रबर, प्लॅस्टीक, पेट्रोलियम इ.उद्योग | १.४८ |
| ४) यंत्र सामुग्री, अवजारे इ. | १.१२ |
| ५) परिवहन सामूग्री व सुटे भाग. | ०.८२ |

आधार - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - १९८३-८४ पृ. ११२.११३

उद्योग धंद्यामध्ये काम करणा-या कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्रात १९६० साली ८ लाख औद्योगिक कामगार होते तर १९८५ साली १२ लाख औद्योगिक कामगार होते.[१५]

---

१३. India 1986 p.528
१४. उद्धृत दास्ताने,संतोष आणि हर्डीकर, विनय : महाराष्ट्र १९८५ पृ.११८
१५. तत्रैव : पृ. २९८.

३) कामगारांचे लोकशाहीतील महत्व

भारताने लोकशाही पध्दतीची शासन व्यवस्था स्विकारली आहे. राष्ट्राचा सर्वांगीण विकास होण्यासाठी उद्योगधंद्याचा विकास होणे महत्वाचे आहे. उद्योगधंद्याचा विकास होणे लोकशाहीला पूरकच आहे. व शासनाने गेल्या चाळीस वर्षात उद्योगधंद्याच्या विकासाकडे लक्ष दिलेले आहे. भारत देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जात असला तरी भारताचा विकास होण्यासाठी उद्योगधंद्याची कास धरावी लागते.

उद्योगधंद्यामध्ये प्रामुख्याने दोन वर्ग दिसून येतात. १) भांडवलदारांचा वर्ग व २) श्रमीकांचा वर्ग अथवा कामगार वर्ग. भांडवलदार वर्ग उद्योगधंद्यामध्ये आपली संपत्तीची गुंतवणूक करीत असतो तर कामगार वर्ग कारखान्यात जावून श्रम करीत असतो उद्योगधंद्यामध्ये संपत्तीची गुंतवणूक करणा-या भांडवलदारास जेवढे महत्व आहे तेवढेच किंबहूना त्याही पेक्षा अधिक महत्व कामगारास आहे. कारखान्यात काम करण्यासाठी कुशल, अकुशल, कामगारांची आवश्यकता असते कामगारांबिना कारखाना उभारु शकत नाही.

देशाचा विकास होण्यासाठी उद्योगधंद्याची गरज आहे तर उद्योगधंद्यामध्ये प्रत्यक्षपणे काम करण्यासाठी कामगारांची गरज आहे. मालक व कामगार उद्योगाच्या रथाची दोन चाके आहेत. रथ चालकासाठी दोन चाकांमध्ये समन्वय असावयास पाहीजे व्यवस्थापन व मालक यांच्यामध्ये सौहार्दपूर्ण वातावरण रहाण्यासाठी कामगारांना नियमाप्रमाणे वेतन, बोनस · व कामाची चांगली परिस्थीती इत्यादी गोष्टी निर्माण केल्या जातात.

भारतात लोकशाही शासन पध्दती असल्यामुळे नियमीतपणे निवडणुका होत असतात व त्या निवडणूकामध्ये कामगार प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सहभागी होत असतो व कामगार हा घटकही महत्वाचा असतो. कामगारांच्या एकत्र शक्तीमुळे संपूर्ण देशाची सत्ता काबीज करण्याची क्षमता आजच्या कामगारांमध्ये आहे या दृष्टीनेही कामगारांचे महत्व आहे.

आधुनिक उद्योगधंदात यांत्रिकी करणाची वाढ झाली. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त उत्पादन यंत्राच्या साहयाने मिळू लागली मानवाची जागा यंत्र मानवाने घेतली असली तरी कामगारांचे महत्व कमी झाले नाही. यंत्रावर काम करण्यासाठी कुशल व अनुभावी कामगार महत्वाचे आहेत. या संदर्भात जे. कृष्णमूर्ती म्हणतात, " People do not see the great challange to the human consciousness, of the computer and genetic engineerin and new technologies. The threat is that the human brain could deteriorate, perhaps even atrophy, if the muscles of the mind were not exercised.[16]

वित्तमंत्री असताना स्व. यशवंतराव चव्हाण म्हणाले की, "भारतातील कामगार हा आता केवळ औद्योगिक क्षेत्रातील महत्वाचा घटक राहिला नसून नवी क्षितीजे जिंकू पाहणा-या बदलत्या भारतीय समाजाचा मानबिंदू झाला आहे"[१७] यावरुन कामगारांचे महत्व लक्षात येते.

---

१६. उद्धृत, धर्माधिकारी, चंद्रशेखर : कामगार चळवळ २००१ आव्हाने व आवाहने (संपादन), पृ. २०

१७. उद्धृत, वसंत (संपादन) : कामगार चळवळ २००१ आव्हाने आणि आवाहने, पृ. १

४) भारतामधील औद्योगिक कामगारांची वैशिष्टये :-

१) एकात्मतेचा अभाव:

एकात्मकतेचा अभाव हे भारतामधील उद्योगधंद्यामध्ये काम करणा-या कामगारांचे एक महत्वपूर्ण व व्यवछेदक लक्षण मानावयाला हवे.

१) औद्योगिक केंद्रामध्ये स्थापन झालेल्या उद्योगामध्ये काम करणारे कामगार हे विविध धर्माचे व जातीचे असतात. भारताच्या सामाजिक जीवनात धर्म आणि जात या दोन अत्यंत महत्वाच्या शक्ती आहेत. दुदैवाने या शक्तींमुळे कामगारांचा वर्ग विभागण्यात आला आहे. एका धर्माच्या व एका जातीच्या कामगारांना त्याच कारखान्यात काम करणा-या दुस-या धर्माच्या व जातींच्या कामगाराबद्दल फारशी आस्था वाटत नाही.

२) तसेच मोठया औद्योगिक केंद्रात काम करणारे कामगार हे निरनिराळया प्रांतांमधून आलेले असतात. मुंबईच्या कापडगिरण्यामध्ये काम करण्यासाठी केवळ, कोकण तसेच सातारा सांगली, कोल्हापूर व अहमदनगर किंवा मराठवाडयातील बीड, उस्मानाबाद, नांदेड, परभणी इ. जिल्हयामधूनच नव्हेतर उत्तर प्रदेश, बिहार, ओरीसा, गुजराथ, आंध्र, म्हैसूर व मद्रास या प्रांतातूनही कामगार मोठया प्रमाणांवर आलेले आहेत. या कामगारांची भाषा, संस्कृती वेगवेगळी असते. साता-याहून आलेला कामगार आंध्रमधून आलेल्या कामगारांशी बोलणार तरी कसा ? भाषांची विभिन्नता हे औद्योगिक कामगारांमध्ये एकात्मतेचा अभाव असण्याला कारणीभूत ठरते.

३) कारखान्यातील कामगार शहराच्या निरनिराळया भागांत राहतात. कारखान्यात कांही तास एकत्र काम करण्याशिवाय त्यांचा परस्परांशी

फारसा संबंध येत नाही. कारखान्यात यंत्राच्या साह्याने कामगारांना करावे लागणारे काम हे इतके कष्टाचे, त्रासाचे व जिकीरीचे असते की ओळख वाढविण्यासाठी किंवा एखाद्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी कामगारांना सवड मिळत नाही.

४) औद्योगिक कामगारांमधील एकात्मतेच्या भावनेचा अभाव आणि कामगार संघटना यामध्ये फार जवळचा संबंध आहे. कामगारांमध्ये एकात्मकता व ऐक्याची भावना नसल्यामुळे भारतात कामगार संघटनांची व्यवस्थितपणे वाढ होत नाही. प्रसंगी कांही संघटना आस्तीत्वात येतात. पण या संघटनांचे कार्य प्रभावी ठरत नाही. बहुसंख्य कामगार संघटनांनी-ही विधायक कार्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे कामगारांच्या दृष्टीकोनात व प्रवृत्तीमध्ये योग्य दिशेने बदल घडून येत नाही.

कामगारांच्या या वैशिष्टयाचा त्यांच्या सौदा क्षमतेवर, हित संबंधावर तसेच कामगार संघटनांच्या कार्यावर-ही विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहत नाही.

(२) <u>निरक्षरता</u>

१९५१ च्या शिरगणतीनुसार भारताच्या लोकसंख्येपैकी फक्त १६.६२ टक्के लोक साक्षर होते. १९७१ व १९८१ च्या शिरगणती अहवालानुसार साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे २९.४५ व ३६.१७ टक्क्यांपर्यंत वाढले. महाराष्ट्रात १९८१ च्या शिरगणतीनुसार ४५.७८ टक्के होते.

शिक्षणाचा प्रसार होऊनही देशामधील बहुसंख्य जनता अजूनही निरक्षार आहे. हे आपणास आकडेवारीवरून दिसून येते. आपल्या देशात एकीकडे साक्षारतेचे प्रमाण व साक्षार व्यक्तींची संख्या वाढते आहे तर दुसरीकडे देशाच्या लोकसंख्येमध्ये झालेल्या वाढीची निष्पत्ती म्हणून निरक्षार व्यक्तींच्या एकूण संख्येत वाढ होत आहे. १९७१ च्या शिरगणतीनुसार देशात ३७.२ कोटी व्यक्ती निरक्षार होत्या. १९८१ च्या शिरगणती अहवालानुसार निरक्षार व्यक्तींची संख्या ४४.५८ कोटीपर्यंत वाढली आहे. बहुसंख्य भारतीय जनता निरक्षार व अज्ञानी असल्यामुळे उद्योगधंद्यामध्ये काम करणा-या कामगारांपैकी अनेक कामगार निरक्षार असणे स्वाभाविकच आहे. कामगारांच्या निरक्षारतेचा अभ्यास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या मेहता समितीने संघटित उद्योगांच्या पुढील पाच क्षेत्रांमध्ये - चहाचे मळे, कोळशाची खाणी, ज्यूट उद्योग व वस्त्रोद्योग आणि लोह व पोलाद उद्योग - राबणा-या कामगारांपैकी ७२ टक्के कामगार निरक्षार होते असा निष्कर्ष काढला.[१८]

एकंदरीत भारतामधील बहुसंख्य कामगार निरक्षार असले तरी निरनिराळया प्रकारच्या उद्योगधंद्यामध्ये व विभिन्न केंद्रामध्ये काम करणा-या कामगारांमध्ये निरक्षारांचे प्रमाण वेगवेगळे आहे. चहाचे मळे, कोळसा उद्योग, ज्यूट उद्योग व वस्त्रोद्योग या परंपरागत किंवा जुन्या उद्योगांमधील निरक्षर कामगारांचे प्रमाण एकूण कामगारांशी असलेले प्रमाण बरेच मोठे आहे.

---

१८. Bhagoliwal; T.N.: Econimics of Labour and Industry Relations p.39 (English)

एका पाहणीनुसार कोळसा उद्योग, चहाचे मळे, ज्यूट उद्योग व वस्त्रोद्योग या उद्योगांमधील निरक्षार कामगारांचे एकूण कामगारांशी असलेले प्रमाण अनुक्रमे ८९•८६, ८७•२१, ८१•२१, व ६०•४९ टक्के आढळून आले•[१९]

(३) अनियमित उपस्थिती

अनियमित उपस्थिती हे सुध्दा आपल्या देशातील औद्योगिक कामगारांचे एक वैशिष्टय मानल्यास ते गैरवाजवी ठरणार नाही• औद्योगिक कामगार आपल्या कामावर नियमितपणे हजर कां नसतात याला अनेक कारणे जबाबदार आहेत• कांही महत्वाच्या कारणांचा येथे उल्लेख केला आहे•

(१) उद्योगांमध्ये काम करणारे मागच्या पिढीमधील बहुसंख्य कामगार हे खेडयात जन्मलेले व बरीच वर्षे खेडयात घालवून नंतर रोजगार मिळविण्याकरिता शहरात आलेले आहेत• हे कामगार खेडयांत राहणा-या आपल्या नातलगांशी संपर्क ठेवून आहेत• त्यामुळे मिळेल ती संधी शोधून असे कामगार खेडयांकडे धाव घेतात व मजुरी बुडण्याची पर्वा न करता तेथे काही काळ घालविण्यासाठी प्रवृत्त होतात•

(२) निम्न जीवनमान, कारखान्यातील कोंदट वातावरण, झोपड पट्टयांमधील अत्यंत वाईट परिस्थिती व तीव्र जीवनसंघर्ष अशा विविध कारणांमुळे कामगारांचे आरोग्य ढासळते व त्यामुळे असे कामगार आपल्या कामावर नियमितपणे हजर राहू शकत नाहीत•

(३) अलीकडे कामगारांमध्ये व्यसनांचे प्रमाण वाढू लागले आहे• मजुरी मिळाली की अनेक कामगार गुत्यावर जातात, दारू पितात व त्यामुळे पुढचे $\frac{1}{2}$ दिवस तरी कामावर हजर राहू शकत नाहीत• कांही कामगार तर दररोज

१९• Bhagoliwal, T.N. : Ecnomics of Labour and Social Walfare p.36 (English)

दारु पीत असल्यामुळे ते नियमितपणे गैरहजर राहतात.

(४) कारखान्यांमधील रात्रपाळी, कारखान्यांत घडून येणारे अपघात, जाबर्सकडून, कामगारांना दिली जाणारी वागणूक, धार्मिक उत्सव, सामाजिक चालीरीती. व कौटुंबिक अडचणी या कारणांमुळेही कामगारांच्या उपस्थितीवर प्रतिकूल परिणाम होतो.

कामगारांच्या अनियमित अनुपस्थितीचे अनेक दुष्परिणाम होतात. खालील मुद्यावरून दुष्परिणामांची कल्पना येऊ शकेल.

(१) अनियमित अनुपस्थितीमुळे सर्वात जास्त नुकसान संबंधित कामगारांचेच होते. कामगारांना कांही मोजक्या सुट्टया असतात, ह्या पेक्षा जास्त मुदतीकरिता कामगार गैरहजर राहिल्यास त्यांची मजुरी बुडते. त्यांच्या उत्पन्नात घट होते व परिणामत: निम्न प्रतीचे जीवनमान जगण्याचा प्रसंग या कामगारांना येतो.

(२) कारखान्यांत अधून मधून हजर राहणाऱ्या कामगारांना प्रशिक्षण देण्याकरिता व्यवस्थापक तयार होत नाहीत. अनियमितपणे उपस्थित राहणाऱ्या कामगारांना प्रशिक्षित करण्यासाठी काही खर्च करण्यात आला तर हा खर्च भरुन निघत नाही किंवा ह्या खर्चाचा मुळीच उपयोग होत नाही असे कारखानदारांना वाटते.

(३) गैरहजर असलेल्या कामगारांच्या जागी काम करण्यासाठी कारखानदारांना बदली कामगार ठेवावे लागतात. बदली कामगार ठेवण्याच्या पध्दतीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

(४) कारखान्यात अधूनमधून हजर राहून उत्पादन कार्यात भाग घेणा-या कामगारांची कार्यक्षमता नियमितपणे हजर राहणा-या कामगारांच्या तुलनेत निश्चीतच कमी असते•

(४) निम्न जीवनमान :-

मजुरीचा अल्प दर, अनियमित उपस्थिती, विभिन्न सामाजिक प्रथा, व व्यसनाधिनता अशा विभिन्न कारणांमुळे भारतामधील बहुसंख्य कामगारांना निम्न प्रतीचे जीवन जगावे लागते• मागील दहा वर्षात सर्व आवश्यक वस्तूंच्या किमती एवढया वेगाने वाढल्या आहेत की त्यामुळे कामगारांच्या वास्तविक उत्पन्नामध्ये बरीच घट झाली आहे• कामगारांची जीवनमान आणि त्यांची कार्यक्षमता यामध्ये फार जवळचा संबंध आहे• निम्न जीवनमान जगणा-या औद्योगिक कामगारांची कार्यक्षमता वरच्या दर्जाची कशी राहू शकेल ?

(५) कामगारांची अकार्यक्षमता

पाश्चात्य देशातील कामगारांच्या तुलनेत भारतामधील औद्योगिक कामगार हे कमी कार्यक्षम आहेत असे म्हटले जाते• आपल्या देशातील कामगारांचे एकूण उत्पन्न कमी असण्याला त्यांची अकार्यक्षमता कारणीभूत आहे असेही मानले जाते• कामगारांच्या अकार्यक्षमतेमुळे ते जास्त उत्पादन करू शकत नाहीत• त्यामुळे कारखान्याची उत्पादकता व उत्पादनाची पातळी कमी होते आणि उत्पादनाचा खर्च मात्रा वाढतो•

भारतामधील औद्योगिक कामगारांच्या अकार्यक्षमतेला कामगारांचे निम्न जीवनमान, प्रतिकूल हवामान, तांत्रिक प्रशिक्षणाचा अभाव,

कारखान्यांमधील काम करण्याची असमाधानकारक परिस्थिती दोषपूर्ण प्रबंधव्यवस्था, वित्तीय व अवित्तिय प्रेरणांचा अभाव आणि असमाधानकारक औद्योगिक संबंध अशा अनेक गोष्टी कारणीभूत आहेत कांही आनुवंशिक वैशिष्टयामुळे भारतामधील औद्योगिक कामगारांची कार्यक्षमता ही प्रगत देशामधील कामगारांच्या कार्यक्षमतेपेक्षा कमी आहे असे मानण्याचे मूळीच कारण नाही•

(६) दैववादी प्रवृत्ती

औद्योगिकरणाच्या प्रक्रियेचा परिणाम उद्योगांमध्ये काम करणा-या लोकांच्या दृष्टीकोनावर आणि विचार करण्याच्या प्रक्रियावर होत असतो• पण भारतामधील औद्योगिक कामगारांच्या बाबतीत औद्योगिकरणाचा त्यांच्या दृष्टीकोनावर व विचार करण्याच्या प्रक्रियेवर फारसा परिणाम घडून आल्याचे आढळून येत नाही• आपल्या देशातील शेतकरी दैववादी आहेत• शेतक-यांचा निसर्गाशी संबंध येत असल्यामुळे आणि भारतीय शेती हा मान्सूनचा जुगार असल्यामुळे, शेतकरी दैवावर हवाला ठेवून आपले जीवन जगत असतील तर ही बाब समजण्यासारखी आहे• पण औद्योगिक कामगारांचा निसर्गाशी संबंध येत नाही असे असूनही काही ठळक औद्योगिक केंद्राचा अपवाद वगळल्यास इतर केंद्रामधील बहुसंख्य औद्योगिक कामगार हे दैववादी असल्याचे आढळून येते• जन्मजात दारिद्र्य, निरक्षरता, अज्ञान, जातीवर आधारलेली भारतामधील प्रचलित ताठर समाजव्यवस्था आणि आर्थिक व सामाजिक विषमता अशी विविध कारणे कामगारांच्या दैववादी प्रवृत्तीला कारणीभूत असावीत• दैववादी प्रवृत्तीमुळे भारतामधील असंख्य

औद्योगिक कामगार पुरुषार्थाला महत्व देत नाहीत. किंवा योग्य दिशेने, संघटितपणे व सहकार्याने प्रयत्न केल्यास आपण आपल्या स्थितीमध्ये अनुकूल बदल घडवून आणू शकतो. असेही त्यांना तीव्रतेने वाटत नाही.

(७) ग्रामीण पार्श्वभूमी :-

उद्योगधंद्यामध्ये काम करणा-या कामगारांपैकी बहुसंख्य कामगारांचा जन्म खेडयात झालेला असतो, ब-याच व्यक्तींचे तारूण्यही खेडयातच गेलेले असते, अनेकांजवळ खेडयात थोडीशी जमीन किंवा एखादे घर असते. आणि शहरात कुटुंबाकरिता राहायला जागा नसल्यामुळे ब-याच कामगारांची बायकामुले सुध्दा खेडयातच असतात. प्रतिकूल परिस्थितीमूळे, ह्या कामगारांना खेडयात रोजगार मिळू शकत नसल्यामुळे ते शहरात येतात. रोजगार मिळू शकत नसल्यामुळे ते शहरात येतात. रोजगार मिळवितात, व नंतर शहरात राहू लागतात. कारखान्यांमध्ये काम करणा-या या कामगारांचे शरीर शहरात असले तरी त्यांचे मन मात्र खेडयातील त्यांच्या कुटुंबात, शेतात व खेडयाच्या आसमंतीत रमलेले असते. या कारणामुळेच मिळेल ती संधी घेऊन हे कामगार खेडयात जातात, तेथे कांही दिवस घालवितात व नंतर पुन्हा कामाकरिता शहरात परत येतात. कामगारांचे व्यक्तीगत, कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक हितसंबंध खेडयातच गुंतलेले असल्यामुळे या कामगारांची शहरातून खेडयाकडे व खेडयातून शहराकडे अशी ये-जा सुरु असते.

### (५) भारतीय संविधानात कामगाराला मिळालेले हक्क

व्यक्तीच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक सांस्कृतिक आवश्यकता पूर्ण करण्याचे ध्येय बाळगून असतात व व्यक्तीत न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या भावनेचे अंकुर निर्माण करतात. भारतीय संविधानाने नागरिकांना सहा प्रकारचे मुलभूत अधिकार प्रदान केलेली आहेत. भारतीय कामगारांना एक नागरिक म्हणून ते सर्व अधिकार प्राप्त झालेले आहेत. घटनेने नागरिकांना मालमत्तेचा अधिकार प्रदान केला होता. परंतु आर्थिक विकासात त्यांची अडचण येवू लागल्यामुळे ते घटनेतून काढून टाकण्यात आले.

१) समानतेचा अधिकार

राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता ( Equality before the law ) अथवा कायद्याचे समान संरक्षण ( Equal protection of the laws ) नाकारणार नाही.[२०]

अनुच्छेद १६(२) अन्वये कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरुन राज्य अखत्याराखालील कोणतीही नोकरी किंवा पद यांच्या करता अपात्र असणार नाही अथवा त्यांच्या बाबतीत त्याचा प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.[२१]

प्रत्येक नागरिकाला राज्यात नोकरी करण्याचा आजीविका प्राप्त करण्याचा किंवा एखादे पद प्राप्त करण्याचा समान अधिकार आहे. कोणत्याही नागरिकाला धर्म, वंश, जाती, कुळ जन्मस्थान, किंवा निवासस्थान यापैकी कोणत्याही आधारावर राज्यातील पद प्राप्त करण्यास अपात्र ठरविता येत नाही.[२२]

---

२०. महाराष्ट्र शासन - भारताचे संविधान - पृ. ५
२१. तत्रैव पृ. ६
२२. जोशी (डॉ) प.ल. : भारतीय संविधान शासन आणि राजकारण पृ. ६६.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

२) स्वातंत्र्याचा अधिकार

स्वातंत्र्य म्हणजे शासनाच्या अपरोक्ष· स्वत:च्या तुटपुंज्या सामग्रीवर व सिमीत सामर्थ्यावर स्वावलंबनाने जीवन जगण्यास व समृध्द करण्यास नागरिकास मिळालेला अवसर म्हणजे स्वातंत्र्य होय".[२३]

अनुच्छेद १९ (क)[२४] अन्वये भाषण व अभिव्यक्ती या स्वातंत्र्याच्या आधारे कामगारांना कोणत्याही विषयावर भाषण व मन व्यक्त करण्याचा अधिकार मिळाला·

अनुच्छेद १९ (ग)[२५] अन्वये अधिसंघ व संघ बनवण्याच्या हक्कानुसार सर्व कामगार समान हेतू व ध्येये ठेवून एकत्र येवून कामगार संघटना तयार करत आहेत या हक्कामुळे देशातील कामगारांची शक्ती एकत्र येत आहे·

३) शोषणाविरुध्द अधिकार

माणसांचा अपव्यापार आणि बिगार व या सारख्या अन्य स्वरूपातील वेठ मना करण्यात आली आहे· आणि या उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यक्तीक्रमण करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल·[२६]

भांडवलदार आपल्या संपत्तीच्या बळावर कामगारांचे शोषण करु शकत नाहीत व त्यांच्यावर दबाव आणु शकत नाहीत·

१४ वर्षाखालील मुलांना कारखाने, खाणी, किंवा धोक्याची ठिकाणे येथे कामाला लावता येत नाही·[२७]

---

२३· वरखेडकर, वसंत : सार्वभौम पृ· ३६·
२४· महाराष्ट्र शासन, भारतीय संविधान पृ· ७·
२५· तत्रैव· पृ· ७·
२६· तत्रैव· पृ· ९·
२७· जोशी, प·ल· : भारतीय संविधान शासन आणि राजकारण· पृ· ७०·

४) धर्म स्वातंत्र्याचा अधिकार

भारतीय परंपरेला अनुसरून प्रत्येक व्यक्तीला आपल्या मनाप्रमाणे धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य घटनेच्या २५ व्या कलमात दिले आहे. व धर्म ही सर्वस्वी वैयक्तिक बाब मानण्यात आली आहे.[२८] या हक्कानुसार प्रत्येक कामगार आपल्या कामाच्या ठिकाणी आपल्या धर्माप्रमाणे आचरण करताना आढळून येते. धार्मिक उत्सव केले जातात.

५) सांस्कृतिक व शैक्षणिक स्वातंत्र्य.

६) घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार

वरील पाच प्रकारच्या मुलभूत अधिकाराचे संरक्षण करण्याकरिता घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिकाराप्रमाणे प्रत्येक नागरिकाला न्यायालयाकडे अर्ज करून आपल्या अधिकारावर झालेले अतिक्रमण दूर करून घेता येते.

मूलभूत हक्काशी निगडीत कामगारांना जे हक्क प्राप्त झालेले आहेत. ते हक्क कामगारांपासून वंचित केले तर या हक्काद्वारे कामगार न्यायालयाद्वारा परत मिळवू शकतात.

मार्गदर्शक तत्वे

नागरिकांचा सामाजिक, राजकिय व आर्थिक दर्जा वाढविण्यास कांही मूलभूत गोष्टी राज्याने करावयास पाहीजे. या दृष्टीने मार्गदर्शक तत्वाचा अंतर्भाव राज्यघटनेत करण्यात आला आहे.

---

२८. जोशी, प.ल. : भारतीय संविधान, शासन व राजकारण. पृ. ७०.

अनुच्छेद ४३ अन्वये अनुरूप विधिविधानाद्वारे किंवा आर्थिक व्यवस्था सुसुत्र करून अथवा अन्य कोणत्याही मार्गाने शेतकी, औद्योगिक, अथवा अन्य प्रकारच्या सर्व मजुरांना काम, निर्वाहवेतन, संतुलित जीवनमान, आणि फुरसतीचा व सामाजिक आणि सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपभोग यांची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील आणि विशेषात: राज्य प्रयत्नशील राहील आणि विशेषत: राज्य ग्रामीण क्षेत्रांमध्ये वैयक्तिक किंवा सहकारी तत्वावर कुटीरोद्योगांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.[२९]

अनुच्छेद ४३ (क) अन्वये कोणत्याही उद्योगधंद्यात गुंतलेले उपक्रम, अस्थापना, किंवा अन्य संघटना यांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांना सहभागी होता यावे यासाठी राज्य अनुरूप विधिविधानाद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने उपाय योजना करील.[३०]

या मार्गदर्शक तत्वानुसार कामगारांना व्यवस्थापनात सहभागी होण्याची संधी मिळत आहे.

६) <u>शिक्षणाची व्याख्या व प्रक्रिया :-</u>

कामगार शिक्षण योजनेविषयी अध्ययन करीत असताना शिक्षण म्हणजे काय ? विषयी थोडेसे विवेचन करणे प्रस्तुत ठिकाणी उचित ठरेल.

---

२९. महाराष्ट्र शासन : भारतीय संविधान पृ. १७.
३०. तत्रैव. पृ. १७.

सामान्यत: शिक्षण या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करताना शाळा, महाविद्यालयांसारख्या औपचारीक संस्थांमधून व्यक्ती जे ज्ञान प्राप्त करून घेते ते शिक्षण असे मानले जाते. दैनंदिन व्यवहारात शिक्षण या संज्ञेचा हाच अर्थ रूढ झाला असून शाळा महाविद्यालयांची पायरीही न चढलेली व्यक्ती ही अशिक्षितच असावयास हवी असे आपण ठामपणे गृहित धरून चालत असतो. पण "शिक्षण" या संज्ञेचा सामान्यत: घेतला जाणारा अर्थ संकुचित असून त्या अर्थामुळे शिक्षण प्रक्रियेचे सर्वस्पर्शी स्वरूप आपल्या लक्षात येऊ शकत नाही. शाळा महाविद्यालयांमधून ठराविक काळांपुरते व ठराविक विषयाबाबत देण्यात येणारे ज्ञान म्हणजेच शिक्षण असे मानण्यात एक प्रमुख अडचण अशी की, शिक्षणाच्या या अर्थामुळे शाळा, महाविद्यालयांमधून बाहेर पडणाऱ्या व्यक्तींच्या शिक्षणास शाळा, महाविद्यालये सोडताच पूर्ण विराम मिळतो असे आपणास मानावे लागते. दुसरे म्हणजे शाळा, महाविद्यालयांसारख्या औपचारिक संस्थांमध्ये दाखलच न झालेल्या व्यक्तींना अशिक्षितच मानावे लागते. शिक्षणाचा संबंध व्यक्तीवर होणाऱ्या संस्काराशी आहे हे लक्षात घेतले तर शिक्षणाचा संकुचित अर्थ कसा दोषपूर्ण आहे हे स्पष्ट होऊ शकेल. "शिक्षण" या संज्ञेचा व्युत्पुत्यर्थ जरी आपण लक्षात घेतला तरी असे आढळून येते की, गुरुजनांनी ज्येष्ठ वा श्रेष्ठ व्यक्तींनी व्यक्तीवर संस्कार करून व्यक्तीत्व घडवून आणलेला बदल म्हणजेच शिक्षण होय. अशा संस्कारासाठी व्यक्तीने औपचारिक शैक्षणिक संस्थांमधून प्रवेश घेणे आवश्यक आहे असे आपणास ज्याप्रमाणे म्हणता येणार नाही त्याच प्रमाणे औपचारिक शिक्षण संस्थामधून बाहेर पडलेल्या व्यक्तीवर समाजात घडत असणारे संस्कार शैक्षणिक संस्थामधून बाहेर पडताच थांबत असतात असे म्हणणेही योग्य होणार नाही.

मेट्स या प्रख्यात शिक्षण शास्त्रांज्ञाच्या मतानुसार "व्यक्तीच्या वर्तनात प्रगतिशील असा बदल घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय."[३१]

"मानव प्राण्यांचे व्यक्तीमत्व घडविण्यात सहाय्यभूत किंवा बाधक ठरणा-या सर्व बाबी शिक्षणांचाच भाग असतात" असे जॉन स्टुअर्ट मिल सारखा तत्ववेत्ता मानते.[३२]

प्रख्यात शिक्षण शास्त्राज्ञ पेस्तॉलॉजी यांच्या मताप्रमाणे "मानवाच्या मूळ जन्मजात व सुप्त शक्तींचा नैसर्गिक सुसंवादी व प्रगतिशील असा विकास घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय."[३३]

"मानवाचे शरीर, मन व आत्मा यांच्यात जे जे उत्कृष्ट असेल त्याचे प्रस्फूटन करून त्यांचा विकास घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय." असे महात्मा गांधीचे मत होते.[३४]

विचारवंत व शिक्षण शास्त्रज्ञांच्या या अर्थाविषयीच्या परीक्षणावरून कांही गोष्टी अत्यंत स्पष्टपणे लक्षात येण्यासारख्या आहेत. शिक्षण हे व्यक्तीवर अन्य व्यक्तीकडून होणा-या संस्काराशी संबंधीत असून व्यक्तीच्या अंगीभूत वा जन्मजात परंतु सुप्त अशा शक्तींचा विकास घडवून आणणे हे अशा संस्काराचे प्रधान उद्दिष्ट असते. व्यक्तींच्या अंगीभूत शक्तीमध्ये विकासशील असा बदल घडवून आणणारी प्रक्रिया अशी शिक्षणाची व्याख्या केल्यास शिक्षण ही एक बहुमितीय प्रक्रियाच ठरेल.

---

३१. उद्धृत संगवे विलास : भारतातील सामाजिक समस्या (संपादन) पृ. २७८

३२. तत्रैव पृ. २७८

३३. तत्रैव पृ. २७८

३४. तत्रैव पृ. २७८

शिक्षणाची व्याख्या :-

शिक्षणाची व्याख्या करताना मार्गारेट मीड म्हणतात की, "नवजात बालकाला समाजाचा सभासद बनवण्याचे समाजाकडून केले जाणारे प्रयत्न म्हणजे शिक्षण होय."[३५]

गिलीन व गिलीन शिक्षणाची व्याख्या करताना म्हणतात, "एका व्यक्तीकडून दुस-या व्यक्तीकडे किंवा एका समूहाकडून दुस-या समूहाकडे संस्कृतीचे संक्रमण ज्या पध्दतीने केले जाते ती पध्दती म्हणजे शिक्षण होय. या संक्रमीत करावयाच्या संस्कृतीमध्ये परंपरा, रितीरिवाज व संस्था या पूर्वीच्या सामाजिक वारसांबरोबरच नविन ज्ञान व तंत्रविद्या यांचाही अंतर्भाव होतो."[३६]

सर्वांगीण स्वरूपाचे शिक्षण देण्याच्या दृष्टीने शाळा, महाविद्यालयां-सारख्या औपचारिक शिक्षण संस्थाना मर्यादितच महत्व आहे. व्यक्तीचा औपचारिक शिक्षण संस्थांशी आयुष्यातील कांही वर्षांपुरताच व त्यातही विशिष्ट काळा पुरताच संबंध येत असतो. या मर्यादित कालावधीत व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधाता येईल असे शिक्षण औपचारिक शिक्षण संस्थामधून मिळणे शक्य असत नाही.

दुसरे म्हणजे हल्लीच्या विशेषीकरणाच्या युगात शाळा, महाविद्यालयांमधील शिक्षणातून भार दिला जातो, तो मुख्यत: व्यक्तींच्या आंशिक विकासावर, काळाच्या गरजांप्रमाणे ते जरी योग्य व अनिवार्य असले तरी तसे आंशिक शिक्षण व्यक्तीच्या अंगीभूत अशा सर्वच गुणांचा व शक्तींचा विकास साधण्यास असमर्थच ठरते.

---

३५. उद्धृत अनंतराम शारदू : सामाजिक संस्था पृ. २४२
३६. उद्धृत कोंडेकर ए.वाय : भारतीय समाजशास्त्र व सामाजिक समस्या पृ. ६६.

७) कामगारांचे कमी शिक्षणामुळे होणारे दुष्परिणाम :-

शिक्षण ही महत्वाची प्रक्रिया आहे. अपु-या शिक्षणामुळे समाजाची अपरिमत हानी होत असते. त्याचे दुष्परिणाम समाजाला भोगावे लागतात तद्वत कामगारही याला अपवाद राहणार नाही. कमी शिक्षणामुळे होणा-या दुष्परिणामांची चर्चा पुढील प्रमाणे करता येईल.

१) कौशाल्यावर परिणाम :-

औद्योगिक क्रांतीनंतर उद्योगधंद्याचे अधुनिकीकरण करण्यात आले. स्वयंचलित यंत्राचा वापरही मोठ्या प्रमाणावर करण्यात येऊ लागला. प्रत्येक कामगाराला एखाद्या वस्तूचा एकच भाग तयार करण्याचे काम करावे लागत आहे. त्यामुळे त्या कामगाराला त्याचे कौशाल्य प्राप्त करुन घेणे महत्वाचे होते. परंतु कामगारांच्या अपु-या शिक्षणामुळे कौशाल्य प्राप्त करुन घेण्यास अडचणी येऊ लागल्या म्हणून कामगारास नोकरीचा राजिनामा देणे भाग होते अथवा कमी कौशाल्याच्या ठिकाणी काम करावे लागते. हा कमी शिक्षणाचा दुष्परिणाम आहे.

२) संघटनेवर परिणाम :-

कामगार हा कामगार संघटनेचा आधारभूत घटक आहे. परंतु कामगारांच्या अपु-या शिक्षणामुळे व अशिक्षितपणामुळे कामगार संघटनेबद्दलच्या गैरसमजूतीमुळे व अज्ञानामुळे कामगार हा कामगार संघटनेचा सदस्य होत नाही. दबावामुळे जरी सदस्य झालेच तर कामगार संघटनेचे सदस्य शुल्क नियमितपणे

भारत नाहीत. कामगार संघटनेचा कारभार समर्थपणे चालण्यासाठी व कामगार संघटना समर्थ बनण्यासाठी कामगार संघटनेची आर्थिक परिस्थिती ही मजबूत असणे गरजेचे आहे. आपल्या कामगार संघटना या आर्थिक दृष्टया दुर्बल आहेत. कामगार संघटनांचे महत्व काय आहे याविषयीचे ज्ञान कामगारांच्या अपु-या शिक्षणामुळे कामगारास समजलेले नाही. कामगारांच्या या अपु-या शिक्षणाचा कामगार संघटनेवर परिणाम झालेला आहे.

३) कामगारांचे शोषण :-

कामगारांच्या अशिक्षितपणाचा व अल्प शिक्षणाचा पुरेपूर फायदा हा मालक वर्गाने घेतलेला आहे. आजही कित्येक कारखान्यातून मालक लोक कामगांराकडून १० ते १२ तास काम करुन घेताना दिसून येतात. अल्प वेतन दिले जाते. कामगारांसाठी अनेक कायदे व कामगार कल्याण योजनांची अंमलबजावणी व्यवस्थीतपणे केली जात नाही. कारण कामगारांचे कायदे समजून घेणेइतपत शिक्षण झालेले नसते. त्यांच्या या अपु-या शिक्षणामुळे मालक वर्गाने त्यांच्यावर अमानुष अत्याचार, शोषण केले तरी ते निमूटपणे सहन केले जाते आणि हा अपु-या शिक्षणाचा दुष्परिणाम होय.

४) उत्पादन :-

कामगारांच्या अल्प शिक्षणाचा मिलच्या उत्पादनावर परिणाम होतो. उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने अनेक नविन पध्दती व स्वयंचलित यंत्रे आज आस्तीत्वात असली तरी त्यांचा वापर करण्याविषयी कामगारांना अपु-या शिक्षणामुळे आकलन होत नाही. तसेच अपु-या शिक्षणामुळे व गैरसमजा मुळे

स्वयंचलित यंत्रांचा वापर करण्यास कामगार विरोध करताना दिसून येतात. जुने ते सोने या म्हणी प्रमाणे कामगार जुन्या पध्दतीला चिकटून बसतात. केवळ अपु-या शिक्षणामुळे उत्पादनांवर दुष्परिणाम होऊन वस्तुंच्या उत्पादनावरील खर्च वाढून किंमत वाढल्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांनाही त्याची भुर्दंड बसल्याविना राहत नाही.

५) आरोग्यावर परिणाम :-

कामगारांच्या अपु-या शिक्षणाचा परिणाम त्यांच्या आरोग्यावरही झाल्याशिवाय राहत नाही. कामगार अनेक व्यसनांच्या आहारी गेलेला असतो. उदा. मद्यपान, धुम्रपान, तंबाखू यांना इ. कामगारांच्या अज्ञानामुळे व गैरसमजामुळे तो आपली शारिरीक व मानसिक दु:खे विसरण्यासाठी मद्यपान करतो. शारिरीक कष्टाची कामे करणारे लोक दिवसाअखेरी अगदी गलीतगात्र झालेली असतात. त्यांच्या शिणालेल्या देहाला चेतनेची आवश्यकता असते याच करिता मद्यपान केले पाहिजे असा विश्वास त्यांना वाटत असतो. मद्याचा घोट घेतल्याने दुप्पट उत्साहाने काम करता येते असा एक भ्रम त्यांच्या मनात असतो. मद्याच्या दुष्परिणामाबद्दल ते पूर्णतया अज्ञानी असतात व याच अज्ञानामुळे असे कामगार अधिकाधिक मद्यपान करु लागतात.

श्री बोंगर यांनी कामगारांचे हे अज्ञान किती विलक्षण असते हे स्पष्ट करताना म्हणतात, "बहुसंख्य कामगार निकृष्ट दर्जाचे जीवन जगत असतात. केवळ कदान्न खाऊनच ते आपला उदरनिर्वाह करीत असतात. तेंव्हा शरीराला हवी असणारी पौष्टिके मद्यपानाने लाभतात असा त्यांचा अज्ञान मूलक भ्रम असतो.

म्हणून निकृष्ट दर्जाच्या कदान्नाला जोड म्हणून ते मद्यपान करतात." [३७]

६) <u>कुटुंब</u> :-

कुटुंब ही महत्वाची सामाजिक संस्था आहे. कुटुंब संस्थेचे सर्व कार्य पार पाडण्यासाठी त्यास पुरेसे शिक्षण आवश्यक असते. कुटुंबातील सदस्य आजारी पडल्यानंतर त्यांची सेवासुश्रुषा करणे औषधोपचार करण्यापेक्षा अज्ञानामुळे तो देवावर विश्वास ठेवतो, भुतपिशाचवर विश्वास ठेवून भूतपिशाच काढण्याचे उपाय करतो, तो डॉक्टरांकडे जात नाही. अपु-या शिक्षणामुळे कुटुंबामध्ये आपापसात गैरसमज निर्माण होऊन कुटुंबच उध्वस्त होण्याची शक्यता असते. केवळ कामगारांच्या अपु-या शिक्षणामुळे कुटुंबावर दुष्परिणाम होतो.

७) <u>लोकशाही</u> :-

लोकशाहीत मतदार हेच लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. मतदारांनी विचारपूर्वक सर्व परिस्थितीची जाणीव ठेवून मतदान करुन आपले प्रतिनिधी निवडणे महत्वाचे असते. कामगार हा ही एक मतदार असल्यामुळे त्यांच्या अपु-या शिक्षणाच्या अभावी तो त्याही क्षेत्रात विचारपूर्वक मतदान करीत नाही. भावनिक आवहानांना बळी पडून जातीयतेवर मतदान करुन किंवा पैशाच्या मोहाला बळी पडून मतदान करताना दिसतो. कामगारांच्या व मतदारांच्या अपु-या शिक्षणाचा फायदा राजकिय नेते घेत असून आज लोकशाहीस धोका निर्माण झालेला आहे. लोकशाहीत अनेक अनिष्ट प्रथांचा शिरकाव होत आहे.

वरील सर्व परिणामांचा विचार करता शिक्षणास अनन्य साधारण महत्व आहे हे दिसून येते.

---

३७. उद्धृत संगवे विलास : भारतातील सामाजिक समस्या (संपादन) पृ. ११४

८) कामगार शिक्षण योजनेचा इतिहास :-

कामगार शिक्षण योजनेचा अभ्यास करण्यापूर्वी कामगार शिक्षणाची आवश्यकता का निर्माण झाली ते पाहणे उचित ठरेल. महाराष्ट्रातीलच नव्हेतर संपूर्ण भारतात बहुतांशी कामगार हे अशिक्षित व अल्पशिक्षित आहेत. त्याला सोलापूर शहर ही अपवाद नाही. भारतातील कामगारांच्या या शैक्षणिक दुरावस्थेमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. आज मालक व कामगार यांच्यातील सामाजिक व औद्योगिक संबंध सलोख्याचे न राहता अतिशय बिघडलेले आहेत त्यांच्यामध्ये संशयाचे गढूळ वातावरण निर्माण झालेले आहे. कामगारांचे ध्येय व मालकांचे ध्येय हे एकमेकांच्या विरुध्द टोकांचे आहे. मालकास अधिकाधिक नफा मिळावा असे वाटत असते तर कामगारांस अधिकाधिक वेतन मिळावे असे वाटत असते. औद्योगिक क्रांतीनंतर श्रमविभाजनाला अतीशय महत्व प्राप्त झाले. श्रमविभाजनामुळे कामाची विभागणी झाली व प्रत्येकाला एखादे विशिष्ट कामच करावे लागते. तसेच स्वयंचलित यंत्राचाही वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. या यंत्राचे ज्ञान कामगारांना अवगत नव्हते.

तसेच भारतामध्ये अनेक कामगार संघटना असल्यातरी कामगार हा कामगार संघटनेचा सदस्य हा स्वेच्छेने होताना दिसत नाही. कारण कामगारांना कामगार संघटनेविषयीचे महत्व व कार्यपध्दतीची माहिती नसते. ज्येष्ठ कामगार नेते व भारताचे माजी राष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी यांनी कामगार संघटनेची व्याख्या करताना ऐच्छीकतेवर भर दिलेला आहे. त्यांच्या शब्दात कामगार संघटनेची व्याख्या पुढील प्रमाणे " सामूहिक कृतीद्वारे आपले हितसंबंध प्रस्थापित

करण्यासाठी व ते अबाधित ठेवण्यासाठी कामगारांनी स्थापिलेली ऐच्छिक संघटना म्हणजे कामगार संघटना होय."[३८]

औद्योगिकरणात कामगारांचा शेतीकडून उद्योगधंद्याकडे मोठ्या प्रमाणावर ओघ सुरु आहे. आणि त्यासाठी औद्योगिक कसब व तंत्र आत्मसात करणे जरुरीचे आहे. सध्या परिस्थितीत कसबी कामगारांचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा भासत आहे. म्हणून कामगारांना शिक्षण देण्याची गरज निर्माण झाली व या गरजेतूनच कामगार शिक्षण योजनेची स्थापना झाली. कामगारांना नुसते कामाचे कसब व कौशल्य शिकवून चालणार नाही तर त्या बरोबरच कामगारांचे मत सुसंस्कृत करुन त्यास प्रेरणाही दिली पाहिजे. जेंव्हा कामगारांना आपल्या भोवतालच्या परिस्थितीची त्यांच्या कामाची त्यांच्या संघटनांची, उद्योगांची, त्यांच्या शहरांची, त्यांच्या देशांची संपूर्ण उमज पडेल तेंव्हाच ते औद्योगिक शांततेचे महत्व जाणू शकतील. निरक्षर कामगारांकडून यंत्रउद्योग उभारणे कठीण आहे हे पुढील अवतरणावरुन स्पष्ट होईल.

"Modern Machine industry depends in a peculiar degree on education, and the attempt to build it up with an illiterate body of workers must be difficult and perileous."[39]

रॉयल आयोगाच्या निरीक्षणास असे आले की,

"In India nearly the whole mass of industrial labour is illiterate, a state of affairs which is unknown in any other country of industrial importance."[40]

---

३८. Giri, V.V. : Labour Problems in Indian Industry p.1(English)

३९. Mehrotra, S.N. : Labour problem in India p.91 (English)

४०. Saxena, R.C. : Labour problem & Labour Welfare p.373(English)

"In most Indian factories it is noticeable that the workers are not the masters, but the servants of their machines," and "they do not understand them, and as a result of negligent handling cause more rapid deterioration than in countries, where the operatives are mechanically minded."[41]

कामगार हा समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. त्याप्रमाणे तो देशाचाही एक घटक आहे. कामगार संघटनेचा सदस्य म्हणून त्यांच्या हितसंबंधाचे ज्ञान देण्यासाठीच कामगार शिक्षणाचा उदय झाला. कामगारांनी आपल्या सांस्कृतिक जीवनाची वाढ, कामगार संघटना कशा उभ्या कराव्यात याचे आकलन करुन घेऊन त्यांनी आपले प्रश्न स्वत:च सोडवले पाहिजेत.

कामाच्या ठिकाणाच्या कामगार कल्याण विषयक तरतुदीविषयी सुध्दा त्यानेच ठरवले पाहिजे. आपल्या कल्याण कारक योजना राबवण्याकरता अधिकाधिक सक्रिय भाग कामगारांनी घ्यावा यासाठी कामगार शिक्षणाची जरुरी आहे. कामगारांचा व्यवस्थानात सहभाग व त्यांच्या कामाच्या ठिकाणच्या सुधारणा या बद्दल त्यांचा दृष्टीकोन शिक्षणाने तयार होतो. औद्योगिक शांततेसाठी लागणारे कामगारांचे यश हे सुध्दा कामगार शिक्षणावर अवलंबून असते आणि आधुनिक यंत्र उद्योग सुध्दा कामगार शिक्षणावर अवलंबून आहे. तसेच उद्योगाची बदलत चाललेली परिस्थिती शासनाचे उद्योगासंबंधीचे धोरण व त्यामुळे कामगारावर येणारी आपत्ती, या सर्व परिस्थितीचा विचार केल्यास कामगार शिक्षण हे आजच्या

---

Quoted by
४१. Mehrotra, S.N. : Op. Cit p.92

काळाची गरज बनली आहे म्हणून, शिक्षित कामगार हाच कामगार संघटनेचा आधारस्तंभ बनून बदलत्या परिस्थितीत संघटना व व्यवस्थापनातील सलोख्याचे संबंध ठेवून उद्योगधंद्याच्या भरभराटीसाठी कामगार शिक्षण आवश्यक आहे.

१) कामगार शिक्षण योजनेची प्रेरणा :-

वाढत्या लोकसंख्येमुळे उत्पादीत मालाची मागणी वाढू लागली त्यामुळे उत्पादन वाढण्यासाठी कामगारांना प्रशिक्षित करणे आवश्यक वाटू लागले या सर्व परिस्थितीमुळे कामगार शिक्षण योजनेचा उदय झाला.

कामगार शिक्षण योजनेचा पुरस्कार दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत केला. कामगार शिक्षण योजना ही केंद्रिय कामगार शिक्षण मंडळ (श्रम मंत्रालय, भारत सरकार) यांच्यामार्फत राबवली जाते. ही योजना राबवण्यासाठी राष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवर कामगार, मालक व सरकार यांची त्रिपक्षीय समिती असते. ही समिती अभ्यासक्रम व योजना राबवण्याबाबत सल्ला देत असते.

केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाची स्थापना १६ सप्टेंबर १९५८ रोजी झाली हे मंडळ अर्ध-स्थापत्य स्वरूपाचे असून त्याची नोंदणी १८६० च्या सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट खाली करण्यात आलेली आहे. भारतातील कामगार शिक्षणाचा कार्यक्रम यशस्वीरितीने राबवून त्याच्या विकासाची जबाबदारी या मंडळावर टाकण्यात आली आहे. फेब्रुवारी १९५९ मध्ये मध्यप्रदेशात इंदूर येथे सर्वप्रथम कामगार शिक्षण केंद्र सुरू झाले. त्याच वर्षी मुंबई, दिल्ली, कलकत्ता, धनबाद, हैद्राबाद, बंगळूर, कानपूर व नागपूर याठिकाणी सुरू झाली.

या मंडळाचे मुख्य कार्यालय नागपूर येथे आहे. आज देशामध्ये एकंदर ४३ केंद्रे कार्यान्वित आहेत. मंडळ ही एक सोसायटी असल्यामुळे तिची वर्षातून एक सभा होते. व त्या सभेत ध्येयधोरणे, विविध कार्यक्रम व प्रगतीचा अहवाल, हिशोब पुढील वर्षाचे अंदाजपत्रक इत्यादी बाबीवर चर्चा होवून निर्णय घेतले जातात.

१०) केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाची उद्दिष्टे व कार्ये :-

केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाने पुढील उद्दिष्टे समोर ठेवून कार्य हाती घेतलेले आहे.

१) ग्रामीण कामगारासहित सर्व प्रकारच्या कामगारांना देशातील सार्वजनिक व आर्थिक विकासात उद्घोषीत उद्दिष्टाप्रमाणे सहभागी होण्यासाठी तयार करणे.

२) कामगारांना त्यांच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नाविषयीची समज (जाण) वाढवणे, कुटुंबाविषयी असलेली त्यांची जबाबदारी तसेच नागरीक म्हणून उद्योगातील कामगार व संघटनेचा सभासद व कार्यकर्ता म्हणून असलेले त्यांचे अधिकार व कर्तव्यांच्या जाणीवेत वाढ करणे.

३) सर्व सामान्य कामगारांतून नेतृत्व विकसित करणे.

४) जागृत सभासद व प्रशिक्षित कार्यकर्त्याद्वारा बलशाली संघटित व अधिक जबाबदार कामगार संघटनांचा विकास करणे.

५) कामगार चळवळीत लोकशाही कार्यपध्दती व प्रथा दृढ करणे.

६) कामगार शिक्षणाचे कार्य कामगार संघटनांनी स्वत:कडे घेण्यास त्यांना समर्थ करणे.

केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाची कार्ये :-

वरील उद्दिष्टांच्या पूर्ती साठी खालील कार्ये हे मंडळ पार पाडीत असते.

१) भारतातील कामगार शिक्षण विषयक ध्येयधोरण ठरवणे.

२) विविध कामगार शिक्षण कार्यक्रमाची आखणी, अंमलबजावणी, पैशाची तरतूद, निरीक्षण व सुसूत्रता आणणे.

३) शैक्षणिक साहित्यांची निर्मिती करणे.

४) शिक्षकांसाठी व कार्यक्रमाचा दर्जा ठरवणे.

५) राष्ट्रीय पातळीवर कामगार संघटना व आखिल भारतीय मंडळे यांना कामगार शिक्षण विभाग स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे.

६) अनुदान योजनेद्वारे कामगार संघटना व इतर संस्थांना कामगार शिक्षण कार्यक्रम घेण्यास उद्युक्त करणे.

७) कामगार शिक्षण क्षेत्रात संशोधन करणे.

८) विदेशातील प्रतिनिधीना आपल्या कामगार शिक्षणाची माहिती व प्रशिक्षण देणे.

९) योजनेतील अधिका-यांना/संबंधिताना विदेशातील कामगार शिक्षण विषयक माहिती व प्रशिक्षण मिळवून देणे.

१०) पत्र व्यवहार रुपाने प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

११) कामगार शिक्षणाचा विकास घडवून आणणे व त्यासाठी आवश्यक असे कार्य करणे.

१२) मंडळाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी आवश्यक असलेले अन्य कार्य करणे.

११) कामगार शिक्षण योजनेचे उद्देश व कार्यपध्दती :-

(अ) कामगार शिक्षण योजनेचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत•

१) कामगारांसाठी देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, ऐक्य, सलोखा, जातीय सामंजस्य, धर्मनिरपेक्षता यांचा अविष्कार घडवणे•

२) उद्योगातील एक घटक आणि संघटनेचा सभासद किंवा पदाधिकारी म्हणून हक्क व कर्तव्याबाबत व्यापक जाणीव विकसीत करणे•

३) कामगारांमधून नेतृत्व निर्माण करणे•

४) जबाबदार संघटनांचा विकास करुन कामगार चळवळीत लोकशाही कार्यपध्दती व प्रथांना बळकटी आणणे आणि या सर्वातून नवी औद्योगिक संस्कृती दृढमूल करणे•

५) या योजनेची म्हणजे कामगार शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी कालांतराने कामगार संघटनांनी उचलावी•

(ब) कामगार शिक्षण योजनेची प्रत्यक्ष कार्यपध्दती :-

कामगार शिक्षण योजनेचे प्रत्यक्ष कार्य तीन स्तरात चालते ते तीन स्तर पुढील प्रमाणे आहेत•

१) शिक्षणाधिकारी

२) कामगार शिक्षक

३) स्थानिक पातळीवरील वर्ग

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१) शिक्षणाधिकारी :-

पहिल्या स्तरामध्ये शिक्षणाधिकारी या पदाकरता प्रशिक्षण दिले जाते. शिक्षणाधिकारी प्रशिक्षणाचा कालावधी हा ३ महिन्याचा असतो. शिक्षणाधिकारी या पदाकरिता सामाजिक विज्ञान शाखेतील कोणत्याही एका विषयातील पद्व्युत्तर पदवी संपादन केलेल्या व्यक्तींची निवड करून ६ महिने विविध केंद्रातून प्रशिक्षण देवून "कामगार नेते, शिक्षण तज्ञ, प्रशासक, मालकांचे प्रतिनिधी, आणि संबंधित व्यक्तींचे सहाय्य घेऊन नवीन भरती केलेल्या उमेद्‌वारांना प्रशिक्षण देतात व प्रशिक्षणात यशस्वी झालेल्या व्यक्तीची शिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती करतात."[४२]

२) दुस-या स्तरंमध्ये शिक्षणाधिकारी, कामगार संघटनांनी व व्यवस्थानांनी शिफारस करून पाठवलेल्या कामगारांना कामगार शिक्षकासाठी प्रशिक्षण देतात. कामगार शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा कालावधी ३ महिन्याचा असतो.

भारताची घटना, लोकशाही, आपलादेश, आपला उद्योग,उत्पादकता, औद्योगिक संबंध, कामगार संघटना चळवळ, श्रमिकांचे अर्थशास्त्र, लोकसंख्या शिक्षण व कुटुंब कल्याण, महत्वाचे कामगार कायदे हा अभ्यासक्रम कामगार शिक्षकाकरता ठेवला आहे.

३) तिस-या स्तरांमध्ये कामगार शिक्षक प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर आपापल्या कारखान्यामध्ये/मिलमध्ये जावून कामगारांसाठी वर्ग घेतात यालाच स्थानिक पातळीवरील वर्ग ( Unit level Classes ) असे नामाभिधान दिले आहे.

---

४२. Mehrotra, S.N. : Op. Cit p.95

पूर्णवेळ आणि अर्धवेळ अशा दोन प्रकारचे कामगारांसाठी वर्ग असतात. पूर्णवेळ वर्गाचा कालावधी तीन आठवड्याचा असतो तर अर्धवेळ वर्गाचा कालावधी तीन महिन्याचा असतो. कामगार चळवळीचा इतिहास, संकल्पना, अर्थव्यवस्था औद्योगिक शिस्त इत्यादी बरोबरच लोकसंख्या शिक्षण स्त्री व बाल कामगारांच्या समस्या इत्यादी विषयांचा कामगार शिक्षण अभ्यासक्रमात समावेश आहे. कामगारांनी कामगार शिक्षण पूर्ण केल्यानंतर कामगारांना प्रमाणपत्रे दिली जातात.

कामगार शिक्षण योजनेचे कार्य मर्यादित प्रमाणात न ठेवता कार्याचा विस्तार केलेला आहे. या विस्तारीत भागांमध्ये १९७७ साली ग्रामीण कामगार शिक्षण योजना सुरू केलेली आहे. यामध्ये असंघटीत भागांचाही समावेश केलेला आहे. त्याच प्रमाणे २ ऑक्टोबर १९७८ पासून प्रौढ शिक्षण योजनेचाही समावेश केला गेला. केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाने ही योजना राबवताना कामगार संघटना अधिक बळकट व प्रभावी करणे, संघटनांच्या प्रशासनात लोकशाही पध्दती व परंपरा वाढीस लावणे, सर्वसाधारण कामगारांमधून नेतृत्व निर्माण करणे आणि कामगारांना नागरिक म्हणून त्यांचे हक्क व कर्तव्यांची जाणीव करून देणे ही उद्दीष्टे समोर ठेवली होती.

१२) कामगार शिक्षण योजनेचे फायदे व उणिवा :-

फायदे :-

१) कामगार शिक्षण योजनेच्या विविध उपक्रमाद्वारे औद्योगिक संबंधाची सखोल माहिती कामगारांना मिळण्यास मदत झाली.

२) कामगार संघटनेविषायी सखोल माहिती मिळून कामगार संघटनेच्या कार्य पध्दतीची माहिती करुन घोणे विषायी व संघाटनेच्या कार्यात सक्रीय सहभाग घोण्याविषायीची आवड निर्माण होण्यास मदत झाली.

३) कामगारांना सर्वांगीण ज्ञान मिळण्यास मदत झाली कामगार हे अशिक्षित व अल्प शिक्षित असल्यामुळे कामगार शिक्षाण अभ्यासक्रमात सर्व विषायांना स्पर्श केलेला आहे व यातून कामगारांना सर्व विषायाचे प्राथमिक ज्ञान मिळण्यास मदत झाली.

४) कामगार व व्यवस्थापन यांच्यातील औद्योगिक संबंध चांगले राहण्यासाठी कामगार शिक्षाणाचा फायदा दोघांनाही झाला.

५) कामगारांना कमी वेळेत व कमी खार्चात शिक्षाण घोण्याची संधी निर्माण झाली व वेळेचा अपव्यय टळला.

६) ज्या कामगारांची शिक्षाण घेण्याची इच्छा अपूरी राहिली असेल अशा कामगारांना शिक्षाण घोणेची उत्तम संधी प्राप्त झाली.

७) कामगार शिक्षाण योजनांतर्गत अध्ययन सहलीमुळे आदर्श कारखाने पाहण्याची संधी मिळते त्याच बरोबर ऐतिहासीक व धार्मिक स्थळेही पहाण्यास मिळतात

उणीवा :-

कामगार शिक्षाण योजनेचे फायदे भरपूर असले तरी शिक्षाण योजनेमध्ये निश्चीतच कांही उणीवा आहेत त्या उणीवा पुढील प्रमाणे.

१) कामगार शिक्षाण योजनेमधील अभ्यासक्रमावर आधारीत जे साहित्य

उपलब्धा आहे ते प्रादेशिक भाषेत नाही• महाराष्ट्रातील बहुसंख्य कामगार मराठी माध्यमाचे आहेत• त्यामुळे कामगार शिक्षकांना व कामगारांनाही साहित्य वाचावयास अल्पप्रमाणात मिळते•

२) कामगार शिक्षण योजना मुख्यत: कामगार संघटनेवर जास्त प्रमाणात भर देत आहे•

३) कामगार शिक्षण योजना अतीशय खार्चिक स्वरूपाचे आहे• प्रत्येक प्रशिक्षित कामगारावर दरडोई रूपये ३० (तीस) खार्च होतो हे पुढील आकडेवारीवरून आपणास दिसून येते•[४३]

| वर्ष | खार्च केलेली रक्कम | प्रशिक्षित कामगार | |
|---|---|---|---|
| १९८१-८२ | ७,१८,४२४-९० | ३०•०८३ | २३•८८ |
| १९८२-८३ | ४,७५,२६९-६६ | १९,९३७ | २३•८३ |
| १९८३-८४ | ८,०४,७६८-५५ | २६,२७६ | ३०•६२ |
| १९८४-८५ | ७,९७,४७२-१० | २२,०४० | ३६•१८ |
| १९८५-८६ | ९,८१,५८८-८० | ३०,८२० | ३१•८४ |
| १९८६-८७ | ७,७३,११३-१५ | २८,८४८ | २६•७९ |
| १९८७-८८ | १०,०५,९९५-०० | २४,८६२ | ४०•४६ |
| ऑक्टो•८८ | २,८४,७०८-०० | १०,५८६ | २६•८९ |
| | ५८,४१,३४०• | १•१९,४५२ | ३०•१९ |

४३• Quarterly Journal, Workers' Education Quarterly Journal of Central Board for Workers' Education, January 1989 p.87 (English)

१३) <u>कामगार शिक्षण योजनेचे महत्व</u>

भारतातील बहुसंख्य कामगार निरक्षार आहेत. १९६४ साली केंद्रसरकारने नियुक्त केलेल्या समितीच्या पाहणी अहवालानुसार वस्त्रोद्योग, पोलाद ज्यूट, आणि खनिज उद्योगातील निरक्षार कामगारांचे प्रमाण अनुक्रमे ६०.४९, ५१.३०, ८१.७९, आणि ८९.८६ होते. तसेच १६-४५ या वयोगटातील निरक्षर कामगारांचे प्रमाण अनुक्रमे ६२.८५, ७३.२, ७०.६० आणि ८३.१५ असे होते. १९७१ च्या शिरगणतीनुसार एकूण कामगारांपैकी शहरी भागात २२.३ व ग्रामीण भागात फक्त ३.२ असे साक्षार कामगारांचे प्रमाणे होते.[४४] कामगारांच्या शिक्षणाच्या अभावामुळे कामगारांना मिळणा-या सुविधांची माहिती त्यांना होत नाही. त्यामुळे कामगारांचे मालकवर्गाकडून शोषण केले जाते. यासाठी कामगार शिक्षणाचे महत्व पुढील मुद्दयावरून स्पष्ट होईल.

१) <u>समायोजन</u> :

औद्योगिकरणानंतर स्वयंचलित यंत्राचा वापर ८० टक्क्यापर्यंत होवु लागला त्यामुळे त्या स्वयंचलित यंत्राचे ज्ञान कामगारांना देणे आवश्यक होते. यंत्रे हाताळण्याची माहिती कामगारांना मिळावी म्हणून या योजनांतर्गत अध्ययन सहल आयोजित करून आदर्श कारखान्याला भेट देऊन तेथील नविन यंत्राची माहिती कामगाराला दिली जाते. या माहितीमुळे कामगारास यंत्राशी समायोजन करण्यास मदत होईल.

---

४४. Quoted by Bhagoliwal, T.N. : Op. Cit. p-38

२) कामगार संघटने संबंधी माहिती :-

कामगार संघटनांचा उदय १९ व्या शतकात झाला असला तरी २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतात कामगार संघटनांचा विकास हा झालेला आढळून येत नाही. कामगारांना कामगार संघटनेचे महत्व. कामगार संघटनेची आवश्यकता व एकत्र शक्तीचे महत्व कमी वाटत होते. किंबहुना त्याविषयीचे कामगारांना अल्प ज्ञान आहे म्हणून कामगार संघटनेचे सदस्यत्व स्विकारणे, एकाच कारखान्यात अनेक संघटनांमुळे निर्माण होणा-या नुकसानीची जाणीव करुन देणे इत्यादी विषयी माहिती कामगारांना दिली जाते. कामगारांना योग्य व उपयुक्त माहिती मिळून तो सद्सद् विवेक बुध्दीने विचार करुन तो निर्णय घेण्यास समर्थ होतो. कामगार संघटनांचा केवळ पगार वाढवून मिळण्याबाबत उपयोग होत नसून कामगारांच्या अनेक समस्या कामगार संघटना सोडवण्यास मदत करतात याची जाणीव या योजनेतून होऊ लागते.

३) औद्योगिक संबंध :-

औद्योगिकरणाने भौतिक वैभव मानवाच्या पायाशी आणले. कमीत कमी श्रमात अधिकाधिक उत्पादन शक्य करुन आपले भौतिक जीवन सुखकर व स्थिर करण्याच्या प्रयत्नांत मानव यशस्वी झाला. पण ऐहिक बाबतीत कमालीची प्रगती करुन सुध्दा औद्योगिकरणाचे कांही विलक्षण चटके मानव अद्याप पर्यंत टाळू शकला नाही. आर्थिक क्षेत्रातील दूरगामी व क्रांतीकारक बदलाने मानवाचे सर्वांगीण जीवन बदलून गेले हे खरे पण याच प्रक्रियेने अनेक सामाजिक समस्याही निर्माण झाल्या. औद्योगिक संबंधाचा प्रश्न हा त्यातील विलक्षण महत्वाचा आहे. यांत्रीकीकरणामुळे उत्पादन साधनांवर संपूर्ण मालकी असणा-या मालकांचा वर्ग व मजूरी हेच जीवन

8727
A.

निर्वाहाचे साधन असणारा कामगार वर्ग यांच्यातील दरी दिवसेंदिवस रुंदावत चालली. दोघांचेही हितसंबंध भिन्न असल्याने व यंत्रोत्पादन पध्दतीने मालक व कामगार यांचे संबंध अधिकाधिक अनौपचारीक, व्यक्तीनिरपेक्ष व हेतू पुरस्सर झाले. मालक व कामगार हे परस्पर संबंधित व एकमेकांवर अवलंबून आहेत. हे विसरुन चालणार नाही. एक उत्पादनातील धोके पत्करुन उत्पादनाची जबाबदारी अंगावर घेणारा आहे. तर दुसरा उत्पादनाचे प्रत्यक्ष काम कारखान्यात राबून करणारा आहे. उत्पादनाचे हे दोन्ही घटक एकमेकांशी निगडित आहेत. यामुळे मालक व कामगार यांच्यातील गैरसमज, संशयाचे ढगाळ वातावरण निवारण्याचा प्रयत्न, इत्यादी बाबीवर मार्गदर्शन करण्यासाठी कामगार शिक्षण योजनेचे महत्व अनन्य साधारण महत्व आहे.

४) <u>कामगार फायदे</u> :-

कामगार विषयक कायद्याकडे जरी आज आधुनिक समाजाचा एक अविभाज्य भाग म्हणून पाहिले जाते. कामगारांसाठी अनेक कायदे निर्माण केले. त्यामध्ये अनेक सुधारणा झाल्या. परंतू या सर्व कायद्याविषयी कामगारांना कल्पना नाही. यामुळे कायदे असूनही आज कामगारांचे शोषण व पिळवणूक होत आहे. त्यांच्यावर अनेक बाबतीत अन्याय केला जात आहे. कामगार कायद्याबरोबर कामगार कल्याण विषयक तरतूदींचाही समावेश केलेला आहे याची साधी जाणीवही कामगारांना नाही. यासाठी कामगारांना कामगार कायदे व कामगार कल्याण विषयक तरतूदींची प्राथमिक माहिती कामगार शिक्षण योजनेतून दिली जाते. ए.जी.क्लोनें म्हटले आहे की, "कामगारांना किती प्रमाणांत संरक्षण दयावे हे कामगार कायदे किती केले यावर अवलंबून नसून किती कायद्यांची योग्य तीअंमलबजावणी झाली. व त्यातील तरतूदी

किती प्रमाणात प्रत्यक्ष उतरविल्या यावर अवलंबून आहे."४५

असे एक मत आहे की, कामगारांविषयी किती कायदे केले, किती प्रमाणात प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झाली यापेक्षा किती कामगारांना या कामगार कायद्यांविषयी माहिती आहे. यावर कायद्यांचे महत्व अवलंबून असते. आज सर्व कामगारांची अशी परिस्थिती आहे की, कोणता कायदा कशासाठी आहे हेच माहिती नसते. फक्त कामगारांना महत्वाच्या कायद्यांची नावे माहिती असतात. त्या कायद्यांचा उपयोग कोणत्या वेळी कोणत्या कारणासाठी होतो. हेच माहिती नसते यामुळे कामगार शिक्षण योजनेचे महत्व आहे.

५) कामगार कल्याण :-

भारतातील बहुसंख्य कामगार हे कर्जबाजारीच असतात. त्यांना मिळणारे वेतन किमान कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी येणारा खर्च यात मेळच बसत नाही. त्यामुळे तो नेहमी कर्ज काढत असतो त्यातच कामगारांना मद्यपानासारखे व्यसन असते. कामगारांमध्ये बचतीची सवय नसते किंबहुना बचत करण्यासाठी पैसाच शिल्लक राहत नाही. या सर्व कामगारांच्या परिस्थितीचा विचार करून शासनाने कामगारांच्या निवृत्ती नंतरच्या आयुष्यात त्यांना कांहीतरी पैसे शिल्लक रहावेत. म्हणून भविष्य निर्वाह निधी व निवृत्ती वेतन ( Gratuety ) या सारख्या योजना काढल्या परंतु कामगारांना या योजना म्हणजे काय हे माहिती नाही. पैसे हे कायद्याने कापले जातात अशीच कामगारांची समजूत होती. म्हणून या कामगार कल्याण विषयक तरतूदींची माहिती तसेच इतर कल्याण विषयक योजनांची कामगारांना माहिती करून देण्यासाठी कामगार शिक्षण योजनेचे महत्व अनन्य साधारण आहे.

---

४५. उद्धृत नाडगोंडे गुरुनाथ : औद्योगिक समाजशास्त्र पृ. ३४४.

९) राष्ट्रीय जबाबदारी :-

सर्व सामान्यपणे असे म्हटले जाते की, कामगारांना कामगार जगताशिवाय दुसरी कोणतीच माहिती होत नाही. हे बहुतांशी खरे आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. कामगारांना आठ तास काम केल्यानंतर इतरत्र लक्ष देण्यास वेळच नसतो व त्याचीही इच्छा नसते. आज आपल्या देशापुढे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. भारताने लोकशाही स्विकारली आहे लोकशाहीत मतदार महत्वाचे असतात. कामगार हाही एक मतदार असल्याने त्याला मतदानाविषयी जाणिव, नागरिकाविषयीची हक्क व कर्तव्ये याविषयीची माहिती देणे महत्वाचे आहे. कामगारांना राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव करून देणेचे कार्य कामगार शिक्षण योजना करत आहे म्हणून कामगार शिक्षण योजनेचे महत्व अनन्य साधारण आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता कामगार शिक्षण योजनेचे महत्व स्पष्ट होते.

१४) कामगार शिक्षण योजनेची सद्य परिस्थिती :-

देशातील एकंदर ४३ कामगार शिक्षण केंद्रामार्फत गेल्या तीन दशकात ७४,७५६ कामगार शिक्षक तयार झाले. आणि त्यांनी ३५,१३,५१२ कामगारांना प्रशिक्षित केले आहे व कार्यासाठी विविध केंद्रिय कामगार संघटनांना त्यासाठी १ कोटी रूपयांवर अनुदान देण्यात येते.[४६]

गेल्या ३० वर्षात या योजनेत प्रशिक्षित झालेल्या कामगारांनी किती प्रमाणात कामगार चळवळीवर प्रभाव पाडलेला आहे याचा विचार करता अल्प का

---

४६. महाराष्ट्र टाईम्स, कामगार जगत (सदर)चा २० डिसेंबर १९८८.

होईना यश मिळालेले आहे. प्रशिक्षित कामगारांनी कामगार चळवळीवर आपली छाप टाकली असती तर आज कामगार संघटनांना जे अनिष्ट वळण लागले ते लागले नसते व ही चळवळ समाजाला बांधील राहीली असती व कामगार शिक्षण योजनेस अतिशय महत्व प्राप्त झाले असते.

कामगार शिक्षण योजना सुरु झाली त्यावेळची म्हणजे ३० वर्षापूर्वीची औद्योगिक संबंध परिस्थिती आणि आजची स्थिती यात जमीन अस्मानाचे अंतर असते. कामगार वर्गात आता तुलनात्मक दृष्टया अधिक जागृती निर्माण झाली असली तरी आजही कामगारांना अनेक बाबतीत शिक्षित करण्याची गरज कमी झालेली नाही उलट ती वाढलेली आहे.

सुरुवातीच्या काळात ज्या मालक वर्गाने, कामगार वर्ग या शिक्षणाने अधिक जागृत होऊन आपल्या विरुध्दच उठाव करील या भितीपोटी कामगार शिक्षणाला विरोध केला तो मालक वर्गही आज या शिक्षणाची भलामण करत आहे. ज्या कामगार संघटना आपल्या तात्कालिक लोकप्रियतेपोटी या कामगार शिक्षणाला तुच्छ लेखत होत्या त्याच आज त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागल्यावर कामगार शिक्षणाची कास धरत आहेत. परिस्थितीने उभयतांना हा धडा शिकवला आहे. कामगार शिक्षण योजना पूर्णपणे ऐच्छिक असतानाही मालक व कामगार संघटनांचे ही योजना राबवण्यासाठी भरघोस सहकार्य मिळत आहे. यावरुन असे म्हणता येईल की, कामगार शिक्षण योजनेस सध्या सहकार्य मिळत आहे व तिचा विकास होत आहे. कामगार शिक्षण योजनेस सध्या परिस्थिती अनुकूल होत आहे.

## १५) कामगार शिक्षण योजना सुधारण्यासाठी सूचना

१) कामगार शिक्षण योजनेत बहुसंख्य कामगार मराठी माध्यमातून शिक्षण

घेतलेले असतात. कामगार शिक्षण योजनेच्या अभ्यासक्रमावर आधारीत केंद्रिय शिक्षण मंडळाने ज्या पुस्तिका ( Booklets ) प्रसिध्द केलेल्या आहेत त्या सर्व इंग्रजीतून आहेत. त्या पुस्तिकांचा सर्व सामान्य कामगारांना फायदा होत नाही सर्व सामान्यांच्या उपयोगाच्या दृष्टिने अभ्यासक्रमावर आधारित मराठी भाषेतून पुस्तिकांची निर्मीती करावी.

२) केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाने कामगारांसाठी अनेक चांगल्या योजना तयार केलेल्या आहेत. अपवादात्मक परिस्थती वगळता कामगार शिक्षण योजनेत साक्षर कामगारांनाच सहभागी होता येते. निरक्षारांसाठी ही योजना फायद्याची नाही. निरक्षारांनाही योग्य प्रमाणात शिक्षणाची संधी मिळवण्यासाठी केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाने विस्तारीत केलेल्या योजनेतील प्रौढ शिक्षण योजना यांचा योग्य समन्वय साधून प्रौढ शिक्षण योजनेची सुरूवात करावी.

३) कामगार संघटनेचे नेतृत्व करणारे नेते कामगारांमधूनच निर्माण होण्यासाठी प्रत्येक औद्योगिक संस्थेत केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाने संघटनांच्या कार्याची आवड असणा-या योग्य उमेद्वारांची निवड करून नेतृत्व संवर्धन वर्ग घ्यावेत.

४) कामगार शिक्षण योजना कामगार संघटनांनी चालवावी. यासाठी मंडळाच्या पदाधिका-यांनी प्रयत्न करावेत व कामगार संघटनांना सर्वतोपरी सहकार्य करावे.

५) कामगार वर्गाची ( Unit level classes )परिणामकारकता पुष्कळांशी कामगार शिक्षकांवर अवलंबून असते म्हणून कामगार शिक्षकाच्या प्रशिक्षणासाठी निवड करताना शिक्षकीपेक्षा विषयी आवड असणारा कर्तबगार बुध्दीमान व हुशार व जास्तीत जास्त शिक्षण घेतलेल्या कामगारांची निवड करावी.

६) कामगार शिक्षणावर प्रतिवर्षी कोट्यावधी रुपयांवर खर्च होतो आहे. या होणाऱ्या खर्चाचे फलीत मिळणे हे सर्वांच्या दृष्टीने अतिशय आनंदाची गोष्ट आहे. कामगारांना सर्व त-हेची माहिती होणे व्यवस्थापन, कामगार संघटना व शासन यांच्या दृष्टीने हिताचे आहे. म्हणून कामगार शिक्षण योजना व्यवस्थीत चालते की नाही याचे निरीक्षण करण्यासाठी विभागावार निरीक्षकांची नियुक्ती करावी व त्यांच्या मार्फत योजनेच्या कार्याचे नियमीत परीक्षण करावे.

७) कामगार शिक्षक व कामगार प्रशिक्षणासाठीच्या अभ्यासक्रमामध्ये स्थानिक पातळीच्या परिस्थितीनुसार बदलण्याविषयी स्थानिक शिक्षणाधिकाऱ्यास अनुमती असावी.

८) कामगार शिक्षण योजनेच्या विकासासाठी केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाने स्थानिक शिक्षण संस्थाचे व विद्यापीठांचे सहकार्य घ्यावे.

९) कामगार शिक्षकांनी शिक्षण योजनेच्या कार्यात सक्रिय आवडीने भाग घेण्यासाठी कामगार शिक्षकांना आकर्षक असे मानधन द्यावे.

१०) कामगार शिक्षकांची गुणवत्ता कायम राहण्यासाठी कामगार शिक्षकांसाठी उजळणीवर्ग, चर्चासत्राचे आयोजन करावे.